25 JAN 2018

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लेखा समितीचे कामकाज ऑनलाईन

## अजित चौगुले : कागदविरहित कामकाजाच्या दिशेने विद्यापीठाचे महत्त्वपूर्ण पाऊल

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २४ : शिवाजी विद्यापीठाच्या वित्त व लेखा समितीचे कामकाज ऑनलाईन पद्धतीने करण्यास सुरुवात झाली आहे. प्रशासकीय बैठकांचे कामकाज गतिमान होण्याच्या दृष्टीने विद्यापीठाने उचललेले हे महत्त्वपूर्ण पाऊल आहे, अशी माहिती प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांनी दिली.

श्री. चौगुले म्हणाले, "केंद्र सरकारच्या 'डिजिटल इंडिया' अभियानाला सकारात्मक प्रतिसाद देऊन प्रशासकीय कामकाज पेपरलेस पद्धतीने करण्यास प्राधान्य देणाऱ्या विद्यापीठाने महत्त्वाच्या बैठकांचे कामकाज ऑनलाईन पद्धतीने करण्याचे निश्चित केले आहे. बैठकांच्या कामकाजाचे केवळ संगणकीकरण नव्हे, तर ऑनलाईन पद्धतीने संपूर्णतः कागदविरहित कामकाज होण्याच्या दृष्टीने पोर्टल निर्माण करण्याचा मनोदय कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केला. त्याला प्रतिसाद म्हणून तशी प्रणाली निर्माण करण्याचे ठरविले.



> पुढील टप्प्यात विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषद, तसेच अधिसभा आदी महत्त्वाच्या सर्व सभा-बैठकांचे कामकाज ऑनलाईन करण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे. या सभांच्या कामकाजाबद्दलची व्याप्ती ही अधिक असल्याने त्यासाठी तांत्रिक व सॉफ्टवेअरच्या दृष्टीने आवश्यक बाबींची पूर्तता केल्यानंतर टप्प्याटप्प्याने या बैठकांचे कामकाजही ऑनलाईन स्वरूपात करण्यात येईल.
> – डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

त्यातून 'शिवाजी विद्यापीठ ऑनलाईन मिटिंग मॅनेजमेंट सिस्टीम' ही ऑनलाईन संगणकीय प्रणाली निर्माण केली."

ते म्हणाले, "युनिकोड स्वरूपात शीर्षक, टिपणी, जोडपत्र या पारंपरिक प्रशासकीय पद्धतीने विविध विभाग व अधिविभागांना विषय सादर करता येणार आहेत. त्यासाठी सर्व विभाग व अधिविभागांना प्रणालीवर स्वतंत्र लॉग इन देण्यात आले आहे. त्यांनी या प्रणालीत प्रवेश करून आपला विषय ऑनलाईन स्वरूपात सादर करावयाचा आहे. हा विषय पुढे संबंधित समितीचे सदस्य, सचिव, अध्यक्ष यांच्याकडेही ऑनलाइन स्वरूपात जातील. या प्रणालीमध्ये अकाऊंट कोड आदी महत्त्वाच्या बाबीही सदस्यांना रेडी रेफरन्ससाठी उपलब्ध केल्या आहेत. 'ईझी एन्ड युजफुल' कंपनीच्या विश्वजित देसाई यांनी या ऑनलाईन सॉफ्टवेअर प्रणालीची निर्मिती केली आहे. तसेच सहायक अधीक्षक नितीन साळोखे यांच्यासह सर्व सहकाऱ्यांचे सहकार्य मिळाल्याचे त्यांनी स्पष्ट केले."

25 JAN 2018

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचे कामकाज पेपरलेस!

## ऑनलाईन मिटिंग मॅनेजमेंट सिस्टीमची निर्मिती; पुढील टप्प्यात महत्त्वाच्या सर्व बैठकांचे कामकाज ऑनलाईन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या महत्त्वाच्या वित्त व लेखा समितीचे कामकाज संपूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने करण्यास सुरवात केली आहे. नुकतीच या पद्धतीने पूर्णत: कागदविरहित स्वरूपातील बैठक यशस्वीपणे पार पडली. विद्यापीठाचे संपूर्ण कामकाज पेपरलेस पद्धतीकडे वाटचाल यानिमित्ताने सुरू झाले आहे.




या प्रणालीबाबत प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले म्हणाले, केंद्र सरकारच्या डिजीटल इंडिया अभियानाला सकारात्मक प्रतिसाद देऊन बहुतांश प्रशासकीय कामकाज पेपरलेस पद्धतीने करण्यास प्राधान्य देणाऱ्या शिवाजी विद्यापीठाने आता आपल्या सर्व महत्त्वाच्याबैठकांचेकामकाजऑनलाईन पद्धतीने करण्याचे निश्चित केले आहे. वित्त व लेखा विभागाच्या वित्त व लेखा समिती, खरेदी समिती, निर्लेखन समिती, विक्री समिती आणि फर्निचर समिती अशा सर्व समित्यांचे कामकाज आता या पुढे पूर्णत: ऑनलाईन पद्धतीने चालणार आहे.

याबाबत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी बैठकीत स्पष्ट केले की, शिवाजी विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागाच्या बैठकांचे कामकाज यशस्वीरीत्या ऑनलाईन केल्यानंतर याच धर्तीवर आता पुढील टप्प्यात विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषद तसेच अधिसभा आदी महत्त्वाच्या सर्व सभा-बैठकांचे कामकाज ऑनलाईन करण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे. या सभांच्या कामकाजाची व्याप्ती ही अधिक असल्याने त्यासाठी तांत्रिक व सॉफ्टवेअरच्या दृष्टीने आवश्यक बाबींची पूर्तता केल्यानंतर टप्प्याटप्प्याने या बैठकांचे कामकाजही ऑनलाईन स्वरूपात करण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 JAN 2018
पुण्यनगरी



कोल्हापूर : प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ग्रंथभेट देऊन विद्यार्थी मंडळाचे सचिव सुनील बिरेदार यांचा सत्कार करण्यात आला.

# विद्यापीठ विद्यार्थी मंडळ सचिवपदी सुनील बिरेदार

कोल्हापूर / प्रतिनिधी : शिवाजी विद्यापीठाच्या अधिविभाग सचिव पदाच्या निवडणुकीमध्ये सर्वाधिक २१ मते पडलेले सुनील बिरेदार यांची सन २०१७-१८ शिवाजी विद्यापीठ अधिविभाग विद्यार्थी मंडळाच्या सचिवपदी निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. निवडणूक बुधवारी विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात पार पडली. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ग्रंथभेट देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. एकही मत अवैध न ठरणे हे या निवडणुकीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरले.

शिवाजी विद्यापीठ अधिविभाग मंडळाच्या सचिवपदाची निवडणूक प्रक्रिया सकाळपासून सुरू होती. एकूण ४८ सदस्यांपैकी बैठकीस ४० सदस्य उपस्थित होते. सदस्यांपैकी सचिव पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या वेळेपर्यंत एकूण १० सदस्यांनी अर्ज दाखल केले. सचिव पदासाठी एकूण १० अर्जांपैकी ७ अर्ज वैध ठरवले. ३ अर्ज अवैध ठरले. त्यानंतर उमेदवारी अर्ज माघारी घेण्याच्या वेळेपर्यंत वैध ७ उमेदवारांपैकी २ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले. ५ उमेदवार विद्यार्थी मंडळाच्या सचिव पदासाठी उभे होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 JAN 2018
लोकसत्ता

# सुनील बिरेदार याचा विजय

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अधिविभाग विद्यार्थी मंडळाच्या सचिवपदाच्या निवडणुकीत सुनील मलकाप्पा बिरेदार याने बुधवारी विजय मिळवला. त्याने पंचरंगी निवडणुकीत यश मिळवले. सन २०१७-१८ सालच्या शिवाजी विद्यापीठ अधिविभाग मंडळाच्या सचिवपदाची निवडणूक प्रक्रिया आज विद्यापीठात पार पडली. या वेळी एकूण ४८ सदस्यांपैकी बैठकीस ४० सदस्य उपस्थित होते. या सदस्यांपैकी सचिवपदासाठी निवडणूक अर्ज दाखल करण्याच्या वेळेपर्यंत १० सदस्यांनी अर्ज दाखल केले. त्यातील ७ अर्ज वैध ठरले. उमेदवारी अर्ज माघारी घेण्याच्या वेळेपर्यंत दोघा उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले. सचिवपदासाठी ४० सदस्यांचे मतदान पार पडले. बिरेदार याला सर्वाधिक २१ मते मिळाल्याने त्याची शिवाजी विद्यापीठ अधिविभाग विद्यार्थी मंडळाच्या सचिवपदी निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ग्रंथभेट देऊन त्याचा सत्कार करण्यात आला.






(छाया : एस. अली)

कोल्हापूर : शहाजी कॉलेजमध्ये निवड प्रक्रिया पूर्ण होताच विद्यार्थ्यांनी विजयी प्रतिनिधीस उचलून घेतले, तर दुसऱ्या छायाचित्रात कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालय येथे जल्लोष करताना महाविद्यालयाचे विद्यार्थी.

# कॉलेज परिसरात उत्साह, गुलाल आणि जल्लोष

## विद्यार्थी मंडळाच्या निवडणुका उत्साहात; कडक पोलीस बंदोबस्त



**ओंकार पाटील**
शहाजी महाविद्यालय



**अक्षय पाटील**
विवेकानंद महाविद्यालय



**किशोरी पसारे**
कमला कॉलेज



**प्रतीक जाधव**
गोखले कॉलेज



**स्वरूप तेली**
कॉमर्स कॉलेज



**अभिषेक श्रीराम**
न्यू कॉलेज



**झुबेर मकानदार**
शहाजी लॉ कॉलेज

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

मनात उडालेली धाकधूक, क्षणाक्षणाला वाढणारी उत्कंठा आणि निवडीची माहिती मिळताच कॉलेज आवारात गुलालाची मुक्त उधळण, असे उत्साही वातावरण शहरातील प्रत्येक महाविद्यालय आवारात प्रत्येकाने अनुभवले.

विद्यापीठ कायद्यांतर्गत शिवाजी विद्यापीठातर्फे महाविद्यालयीन व विद्यापीठ अधिविभाग विद्यार्थी मंडळाच्या निवडी बुधवारी शहरातील प्रत्येक महाविद्यालयात दुपारपर्यंत पार पडल्या. त्यामध्ये महाविद्यालय जीएस (महाविद्यालयीन सचिव), यूआर (विद्यापीठ प्रतिनिधी) व एलआर (महिला प्रतिनिधी) पदांसाठी ही प्रक्रिया राबवण्यात आली. ही निवड प्रक्रिया गुणवत्तेच्या आधारावर घेण्यात आली असून, तब्बल तीन वर्षानंतर ही निवड प्रक्रिया घेतली गेली. काही महाविद्यालयांमध्ये बिनविरोध, तर काही ठिकाणी एकापेक्षा जास्त उमेदवारांमुळे मतदान घेण्यात आले.

या निवडीसाठी आपली किंवा आपल्या जवळच्या मित्र-मैत्रिणीची निवड केली जावी, यासाठी विद्यार्थ्यांकडून जोरदार तयारी करण्यात आली होती. काही महाविद्यालयांच्या निवडीवर राजकीय नेत्यांचे वारसदार, तरुण मंडळे वा गटांचे प्रमुख यांचे मंगळवारपासून लक्ष होते. सकाळपासून अशा मंडळींनी या निवडींकडे लक्ष घालून आपले प्रतिनिधी महाविद्यालय आवारात तैनात केले होते. विद्यापीठाच्या अंतर्गत २८० महाविद्यालये आहेत. विद्यापीठात ४६ डिपार्टमेंट आहेत. त्या प्रत्येकी एका सचिवाची (जीएस) निवड करण्यात आली. सकाळी ९ वाजल्यापासून सर्वच महाविद्यालयांवर उत्साहाचे वातावरण होते. काही ठिकाणी निवडी बिनविरोध असल्याने घोषणा होताच फटाके, आतषबाजी आणि घोषणांनी कॉलेज कॅम्पस दुमदुमला. तर काही कॉलेजमध्यें मतदान प्रक्रिया सुरू असल्याने दुपारपर्यंत विद्यार्थी समर्थकांची उत्कंठा लागून राहिली होती. दुपारी निवडीचे चित्र स्पष्ट होताच निवडलेल्या उमेदवाराला उचलून अक्षरशः नाचवले. शहरातील शहाजी महाविद्यालय, विवेकानंद महाविद्यालय, कॉमर्स कॉलेज, न्यू कॉलेज या ठिकाणी तरुणांचा उत्साह ओसंडून वहात होता, तर निवडींच्या पार्श्वभूमीवर सर्वच महाविद्यालय परिसरामध्ये सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

### निवड झालेले महाविद्यालय प्रतिनिधी

**शहाजी छत्रपती महाविद्यालय :** **जनरल सेक्रेटरी** - ओंकार सुरेश पाटील (बी. ए.-३) - ६ मतांनी विजयी **विद्यापीठ प्रतिनिधी**- अमित राजेश चव्हाण (बी.ए.-३) **विद्यार्थिनी प्रतिनिधी** - सारिका विठ्ठल डफले (बी.कॉम-३) **विवेकानंद महाविद्यालय :** **जनरल सेक्रेटरी** - अक्षय पाटील (बी.ए.-३) - बिनविरोध. **कमला कॉलेज :** **जनरल सेक्रेटरी** : किशोरी राजू पसारे (एम.ए.-२) - ३ मतांनी विजयी. **गोखले महाविद्यालय :** **जनरल सेक्रेटरी :-** प्रतीक जाधव (बी.ए.-३) **विद्यापीठ प्रतिनिधी :-** गिरीश सरोदे :- (बी.एस्सी.-३) **विद्यार्थिनी प्रतिनिधी :-** मानसी मल्लपा पाटील (बी.कॉम.-२). **कॉलेज ऑफ कॉमर्स :** **जनरल सेक्रेटरी :-** स्वरूप नंदकुमार तेली :- (बी.कॉम.-२). **न्यू कॉलेज :** **जनरल सेक्रेटरी :-** अभिषेक श्रीराम (बी.कॉम. ३) : ९ मतांनी विजयी. **शहाजी लॉ कॉलेज :** **जनरल सेक्रेटरी :-** झुबेर मकानदार : ७ मतांनी.

25 JAN 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ अधिविभाग स्टुडंट कौन्सिल निवडणूक चुरशीने

## विद्यापीठ सचिवपदी सुनील बिरेदार यांची निवड

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी अधिविभाग स्टुडंट कौन्सिलची निवडणूक बुधवारी चुरशीने पार पडली. अधिविभाग सचिवपदी सुनील बिरेदार (वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र विभाग) याची बहुमतांनी निवड झाली. त्याला २१ मते मिळाली. तर त्याचे प्रतिस्पर्धी प्रिती यादव १०, ऐमन देसाई ९, सच्चिदानंद भोसले ४, प्रियांका शिंदे २ अशी मते मिळाली. निवडणुक अधिकारी म्हणून विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी काम पाहिले. निवडीनंतर प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सुनील बिरेदार याचे ग्रंथ देवून अभिनंदन केले.

विद्यापीठ अधिविभाग विद्यार्थी मंडळाची निवडणूक विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात पार पडली. ४८ पैकी ४० विभागांचे वर्गप्रतिनिधी उपस्थित होते. विद्यापीठ अधिविभागनिवडणुकीमध्ये सर्व विद्यार्थ्यांना निवडणुक अर्ज कसा भरायचा याच्या सुचना व त्यावर त्यांची हरकत विचारून पुढील निवडणूक प्रक्रिया राबवली. ४० अधिविभागातील वर्गप्रतिनिधींमध्ये ३० मुली व १० मुलांचा सहभाग होता. यापैकी १० विद्यार्थ्यांनी सचिवपदासाठी अर्ज भरला होता. यामध्ये ३ अर्ज अवैध ठरले तर २ उमेदवारांनी माघार घेतली. सच्चिदानंद भोसले, सुनील बिरेदार ऐमन देसाई, प्रिती यादव प्रियांका शिंदे या पाच उमेदवारांमध्ये सचिवपदासाठी मतदान झाले. यांच्यातून सुनील बिरेदार सर्वाधिक मतांनी निवडून आला.



सुनील बिरेदार

### अध्यक्ष व सचिव पदासाठी १५ उमेदवारांची निवड

स्टुडंट कौन्सिल निवडणूकीतून विद्यापीठ अधिविभाग व महाविद्यालय सचिवाची निवड करण्यात आली. महाविद्यालय सचिवांचे अर्ज १ फेब्रुवारीला विद्यापीठ प्रशासनाकडे जमा झाल्यानंतर या अर्जांची छाननी करून विद्यापीठ अध्यक्ष व सचिव पदाच्या निवडणूकीसाठी १५ उमेदवारांची निवड करण्यात येणार आहे. २७ फेब्रुवारीला विद्यापीठ अध्यक्ष व सचिव पदासाठी या १५ उमेदवारांमध्ये मतदान होईल.

### एकही मत बाद नाही

स्टुडंट कौन्सिलची निवडणूक मेरीटनुसार असल्याने मतदानासाठी पसंतीक्रम होता. असे असतानाही एकही मतदान बाद झाले नाही.

## महाविद्यालयीन सचिवपदी निवड



किशोरी पसारे



अभिषेक श्रीराम



ओंकार पाटील



गिरीष आसोदे



प्रसाद शेटे



मैथिली आर्वे



अक्षय पाटील



स्वरूप तेली



जुबेर मकानदार



विश्वास कोळी

### प्रसाद शेटे, विश्वास कोळी, दत्तात्रय रावण, अश्फाक शिकलगार सचिवपदी

महाविद्यालय पातळीवरील डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सचिवपदी प्रसाद शेटे याची बिनविरोध निवड झाली. प्रसाद महापालिकेतील काँग्रेसचे ज्येष्ठ नगरसेवक भुपाल शेटे यांचा पुत्र आहे. भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या सचिवपदी विश्वास कोळी ७ पैकी ४ मते घेऊन निवडून आला. प्रतिस्पर्धी उमेदवार आरती यादव हिला ३ मते मिळाली. केएमसी कॉलेजमध्ये दत्तात्रय रावणने ८ पैकी ४ मते मिळवत प्रतिस्पर्धी उमेदवार विकास नागरपोळे, पी. एस. मिरजकरला हरवले. या दोघांनाही प्रत्येकी २ मते मिळाली. महावीर कॉलेजच्या आश्फाक शिकलगार (बी. ए. भाग २) याची सचिवपदी निवड झाली. प्रतिस्पर्धी स्नेहल पाटीलचा एका मताने पराभव झाला. मतदानानंतर विद्यार्थ्यांनी गुलालाची उधळण केली.

लोकमत

25 JAN 2018

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कॉलेजकुमारांचा जल्लोष...

नसीर अत्तार



कोल्हापुरात बुधवारी शिवाजी विद्यापीठ अधिविभागाच्या सचिवपदाच्या निवडणुकीत विजयी ठरलेल्या सुनील बिरेदार आणि त्याच्या समर्थक मित्र-मैत्रिणींनी विजयी मुद्रा दाखवून आनंद व्यक्त केला.

आदित्य वेल्हाळ



कोल्हापुरातील दसरा चौकातील शहाजी कॉलेजच्या जी.एस.पदी ओंकार सुरेश पाटील याची बिनविरोध निवड झाली. निवडीनंतर कॉलेज परिसरात विद्यार्थ्यांनी गुलालाची उधळण करून जल्लोष केला.



कोल्हापुरात बुधवारी कमला महाविद्यालयाच्या जी.एस.पदी विजयी ठरलेल्या किशोरी पसारे आणि तिच्या समर्थक मैत्रिणींनी असा एकच जल्लोष केला.

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 JAN 2018
लोकमत



## साहित्य भान

प्रा. रणधीर शिंदे

# लोकसाहित्याच्या खुणा

लोक परंपरा आणि वाङ्मय यात कमालीचे अनुबंध असतात. मौखिक आविष्काराचे अनेकमुखी स्रोत वाङ्मयातून आविष्कृत झालेले असतात. आधुनिक लेखकांना आपल्या भाषिक परंपरेतील सांस्कृतिक ठेव्यांचे कमालीचे आकर्षण असते. लोककथा, कहाण्या, गोष्टी, गाणी व इतरही लोकभाषारूपांची कल्पक अशी जाण लेखकांनी व्यक्त केलेली आहे. आधुनिक साहित्याने कथनासाठी लोकसाहित्यातील अनेक गोष्टींचा वापर केलेला आहे. तो पारंपरिक अर्थानेही जसा केला, तसाच तो विचलनाच्या बाजूनेही केला आहे. पारंपरिक कथा सांगाड्यात नवी गोष्ट रचण्याचा जसा प्रयत्न झाला. तसाच तो जुनी गोष्ट उलटविण्याचा देखील प्रकार झालेला आहे. गौरी देशपांडे 'कावळ्या चिमण्याची गोष्ट', तसेच अलीकडे विलास सारंग यांच्या कथेत आधुनिकतावादी जीवनदृष्टीच्या प्रकटीकरणासाठी लोकवाङ्मयाचा फार कौशल्याने वापर केला केला आहे. राजन गवस, मोहन पाटील, प्रवीण बांदेकर व कृष्णात खोत यांच्या कादंबऱ्या, आनंद पाटील यांची 'कहाणी एका वरमाईची' व किरण गुरव यांची 'काळी कपिला गाय', यासारख्या कथांतून लोकसाहित्याच्या अनेक प्रभाव खुणा आहेत.




भालचंद्र नेमाडे यांची २०१० साली प्रसिद्ध झालेल्या 'हिंदू-जगण्याची समृद्ध 'अडगळ' कादंबरीतून या लोकाविष्काराचा घनदाट आणि भरगच्च आविष्कार झाला आहे. मीहोनजोदडो ते मोरगाव असा पाच हजार वर्षांच्या जाणिवांचा इतिहास त्यांनी मौखिक आविष्कार रूपातून शोधला आहे. या काळातील मराठी समाजाच्या वाटचालीच्या दिशा आणि मराठी संस्कृतीचा बहुविध रंगाचा चलस्वरूपाचा नकाशा या कादंबरीद्वारे मांडला आहे. शेती संस्कृतीच्या पराभवाची महागाथा, मध्यमवर्गीय सुरक्षित सुखवादी बांडगुळी समाज आणि शतकानुशतकांपासून मणमणाचे संचित घेऊन वाहत आलेल्या कष्टकरी समाजाचे बृहद्चित्र कादंबरीत आहे. वारकरी आणि महानुभवीय जीवनदृष्टीची जोड असणाऱ्या लोकसाहित्याच्या अनेक तत्त्वांचा वापर या महाकथनात केला आहे.

कादंबरीच्या प्रारंभीच कथनकर्ता नायकाला म्हणतो, ही तर मोठी आफत आली आपल्यासारख्या माणसांवर हल्ली. सांगायला गोष्टच तेवढी कुणाजवळ नसते, बाकी सगळं असतं. हा आजच्या जगण्यातील गोष्टीरूपाचा अभाव सांगून, कादंबरीच्या अखेरीस पंचवीस-तीस फाटके, रापलेले घाटावरच्या ऊसतोड मजुरांच्या सामूहिक सांगाती गाऱ्हाण्याचे गानस्वर आहेत. 'देवा हे घर नांदत राहू दे. देवा, या घराची येल मांडवावर चढू दे, थोरल्या बायेच्या पुत्राच्या उंबरात लेकरू नांदू दे.' या मानवी सृष्टीच्या नित्यनूतनाच्या साफल्याच्या नांदवणुकीच्या स्वराने शेवट केला आहे तो फार अन्वर्थक असा केला आहे. नेमाडे लोकवाङ्मयाचा किती कल्पकतेने वापर करतात ते पुढील उदाहरणावरून दिसून येते. उदा. रेणुकादेवीच्या चौंडक्यावरच्या गाण्यातील 'रामाच्या भीतीनं आईनं धरलं आडरान' या ओळीत परशुराम-रेणुकेच्या मिथकाचे पुनर्वाचन आहे. तर 'चिऊताई, चिऊताई काय करता? रांधते, भरवते पाजते, जोजवते, भांडी घासते, धुणं धुते' या शब्दांतून आताच्या स्त्रीकष्टाच्या यातनेचा फलक विस्तृत करतात. जिवतीची कहाणी, महानुभवियांच्या गोष्टी, म्हाताऱ्या आया-बायांनी सांगितलेल्या कहाण्या, भिल्लांचे अद्भूत बेधुंद नृत्य, गाण्यांचे सामूहिक कोरस, गोंधळी गीते, पोवाडे, त्यातले चौक, बलिप्रतिपदेची गाणी, संबळ, सनई, डफ, ढोलाचे निनाद, धनगरी ओव्या, मंत्रमुग्ध करणारे नृत्यविलास या लोकसंस्कृतीच्या ऐवजाचा फार खुबीने वापर नेमाडे यांनी केला आहे. परंपरासंचित आणि सुजलेल्या संस्कृतीतील अंतर्विरोध दर्शविणाऱ्या बहुसंख्याकांच्या सामूहिक मनाचा गजर या कादंबरीत आहे.

(लेखक शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्राध्यापक आहेत)
kollokmatpratisad@gmail.com

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

25 JAN 2018

तरुण भारत

# सह्याद्रीच्या लेकरांनी अनुभवली करवीरनगरी

## हिल रायडर्स अॅण्ड हायकर्स ग्रुप आणि सार्थक क्रिएशनचा अभिनव उपक्रम : शहरी जीवन, पद्धती घेणार जाणून ; ऐतिहासिक स्थळांना देणार भेटी

प्रतिनिधी
कोल्हापूर

जिल्ह्याच्या दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनी बुधवारी राजर्षी शाहूंच्या ऐतिहासिक करवीर नगरीला भेट दिली. पुढील दोन दिवस हे विद्यार्थी कोल्हापुरात राहणार आहेत. हिल रायडर्स आणि सार्थक क्रिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सह्याद्रीच्या दऱ्या खोऱ्यात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना शहरात येणे म्हणजे एक पर्वणीच असते. पण परीस्थिती आणि साधनसुविधेच्या अभावी त्यांना शहरी जीवन अनुभवता येत नाही. हीच बाब लक्षात घेऊन हिलरायडर्स आणि सार्थक क्रिएशन यांनी 'काठी न घोंगडं घेऊ द्या की रं, मला बी कोल्हापुरला येऊ द्या की'..! या उपक्रमाचे आयोजन केले. यामध्ये त्यांनी दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना करवीर नगरीची सैर घडवून आणण्याचे ठरवले. या उपक्रमामध्ये आजरा, चंदगड, गडहिंग्लज, भुदरगड, राधानगरी, शाहूवाडी आणि गगनबावडा या तालुक्यातील एकूण १६० विद्यार्थी, विद्यार्थीनींचा सहभाग आहे. बुधवारी सकाळी हे सर्व विद्यार्थी कोल्हापुरात आले. छत्रपती शिवाजी विद्यापीठात या विद्यार्थ्यांची निवास व्यवस्था करण्यात आली आहे. दुपारी १२ वाजता हे विद्यार्थी अंबाबाई मंदिरात आले. त्यांनी देवीचे दर्शन घेतले. त्यानंतर भवानी मंडपामध्ये या विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांचे स्वागत केले गेले. तेथून हे विद्यार्थी न्यू पॅलेसमध्ये गेले. राजवाड्याचा परिसर तेथील वन्यजीव, वस्तू संग्रहालय त्यांनी पाहिले. पोलीस अधीक्षक कार्यालयालाही भेट दिली.



कोल्हापूर : दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनी करवीर निवासिनी अंबाबाईचे दर्शन घेतले.

गुरुवारी हे विद्यार्थी कणेरीमठ, शाहू सहकारी साखर कारखाना, गोकूळ यांना भेटी देणार आहेत. दुपारी पीव्हीआर थिएटरमध्ये त्यांना चित्रपट दाखवण्यात येणार आहे. शिवाजी विद्यापीठात त्यांना मूर्ती कला, नृत्य कला याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. सार्थक क्रिएशनचे सागर बगाडे आणि हिल रायडर्सचे प्रमोद पाटील यांनी या उपक्रमाचे नियोजन केले आहे.

ज्या विद्यार्थ्यांना शहरी जीवन अनुभवता येत नाही त्यांना या निमित्ताने ते अनुभवता येईल. या उपक्रमामुळे आम्ही खऱ्या अर्थाने प्रजास्ताक दिन साजरा करणार आहेत, असे सागर बगाडे यांनी सांगितले.

### विद्यार्थी करणार ध्वजारोहण

दुर्गम भागातून आलेल्या विद्यार्थीच्या हस्ते विद्यापीठात शुक्रवारी ध्वजारोहण केले जाणार आहे. एका अर्थाने या विद्यार्थ्यांना दिलेला हा सन्मान आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

25 JAN 2018

तरूण भारत

# 'राजारामबापू कॉलेज'मध्ये इन्क्युबेशन सेंटरला मान्यता

प्रतिनिधी
कोल्हापूर

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील आर्थिकदृष्ट्या कमकुवत महाविद्यालय अर्थसहाय्य योजनेंतर्गत संलग्नित पारंपारिक महाविद्यालयांना छाननी समितीने केलेल्या शिफारशीनुसार अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली. राजारामबापू कॉलेज ऑफ शुगर टेक्नॉलॉजी, इस्लामपूर, (ता. वाळवा, जि. सांगली) येथे 'टेक्नॉलॉजी बिझनेस इन्क्युबेशन सेंटर' सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. हा निर्णय कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला.

**शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेत निर्णय**

मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व मुंबई मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून 'विज्ञानकथा कार्यशाळा" या विषयावर शिवाजी विद्यापीठामध्ये कार्यशाळा आयोजित करण्यास मान्यता देण्यात आली. सन २०१६ -१७ चा वार्षिक लेखी ताळेबंद पत्रक लेखापरीक्षण अहवालासंदर्भात (अनुपालन अहवाल) वित्त व लेखाविभागाने केलेल्या शिफारशीस मान्यता देण्यात आली. शिवाजी विद्यापीठ आणि नॅशनल तैवान युनिवर्सिटी ऑफ सायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजी यांच्यातील सामंजस्य करार करण्यास मान्यता देण्यात आली.

25 JAN 2018 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत 'शरद'चे विद्यार्थी

**जयसिंगपूर / प्रतिनिधी :**

यड्राव येथील शरद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे विद्यार्थी शिवाजी विद्यापीठाच्या इलेक्ट्रिकल विभाग गुणवत्ता यादीतील पहिले तीन क्रमांक मिळविले आहेत. श्वेता मलगोंडा पाटील हिने शिवाजी विद्यापीठात प्रथम क्रमांक पटकावला आहे. शरद इंजिनिअरिंगचे इतर विद्यार्थीही विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत झळकले आहेत. शरद इन्स्टिट्यूटने विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत झळकण्याची परंपरा कायम ठेवून तंत्रशिक्षणातील गुणवत्ता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे.

मे २०१७ ला झालेल्या परीक्षेत शरद इंजिनिअरिंगच्या श्वेता पाटील हिने ८२.५६ टक्के गुण मिळवून शिवाजी विद्यापीठाच्या इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागात प्रथम क्रमांक मिळविला. त्याच विभागात ज्योती पंडित लोखंडे हिने ८२.५० द्वितीय, तर ऋतुजा लक्ष्मण पाटील ८१.२५ गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे. कॉम्प्युटर सायन्स विभागातील पूनम अभयकुमार उपाध्ये (८१.०६) हिने विद्यापीठात तिसरा, तर सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील अक्षय राजकुमार उपाध्ये याने ८२.५६ गुण मिळवून विद्यापीठात चौथा क्रमांक मिळविला आहे. त्याचबरोबर सुहास राजाराम पाटील याने ८०.०६ टक्के गुण मिळवून इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागात विद्यापीठात सातवा क्रमांक मिळविला आहे.

आज शरद शिक्षण संकुलाची ओळख ही विद्यार्थ्यांची सुसंस्कारित व उच्च गुणवत्तापूर्ण भविष्य घडविणारी संस्था म्हणून नावलौकिकास आली आहे. शरद स्टार्टअप सेंटर, इनोव्हेशन सेंटर, प्रोजेक्ट बेस्ड लर्निंग, व्हॅल्यू ॲडेड प्रोग्रॅम अंतर्गत कौशल्यपूर्ण शिक्षण, युजी फेलोशिपअंतर्गत जगातील नामांकित विद्यापीठात तांत्रिक प्रशिक्षण, शेकडो मुलांना नामांकित कंपनीत नोकरी, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील अनेक उद्योग व इन्स्टिट्यूटसोबत समन्वय करून विद्यार्थ्यांना वेगळी दिशा देण्याचे काम संस्था करत आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन डॉ. राजेंद्र पाटील- यड्रावकर, एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर अनिल बागणे यांनी कौतुक केले. एस. ए. खोत, उपप्राचार्या एस. पी. कुलेकर, डीन शशिराज चौगुले, एस. डी. पाटील, के. एन. रोडे, डॉ. किरण भगाटे, विभागप्रमुख मंगेश कुलकर्णी, वेंकटेश शंकर, बी. एस. पाटील, एन. सी. हिरेमठ, के. ए. कुपाडे, के. व्ही. खोत यांच्यासह सर्व विभाग प्रमुख व प्राध्यापक यांचे मार्गदर्शन लाभले.